: MHAM15-000001-2018

नियमित.फौ.प्र.क्र. ०१/१८
न्यायनिर्णय

दाखल तारीख ०१/०१/२०१८
नोंदणी तारीख ०१/०१/२०१८
निकाल तारीख ०११/०६/२०१८
कालावधी ०५ म., दि.१०

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, मोर्शी, जि.अमरावती यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी आ.म.गोंडाणे)

**<u>नि.फौ.प्र.क्र– १/१८</u>**

सरकार तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस ठाणे मोर्शी,, ता.मोर्शी,
जि.अमरावती. ... अभियोग पक्ष

–विरूध्द–

१) सुनिल देविदास राउत
वय २८ वर्षे, धंदा – मजुरी,
२) देविदास महादेव राउत
वय ६२ वर्षे, धंदा – मजुरी,
३) सौ.संगिता अशोकराव केमेकर
वय ४० वर्षे, धंदा – मजुरी,
४) सौ.माधुरी जितेन्द्र बोबडे
वय ३० वर्षे, धंदा – मजुरी,
५) वर्षा उर्फ सोनु नितीनराव बोबडे
वय २७ वर्षे, धंदा मजुरी
आ.क्रं. १,२ रा.हिवरखेड, आ.क्रं.३ रा.निंभी
मोर्शी जि.अमरावती.
आ.क्रं.४,५ रा.अमरावती, ता.जि.अमरावती. ... आरोपी

.............................................................................................................
श्री.एस.आर.साहू अभियोग पक्षातर्फे अधिवक्ता
श्री. ऐ.जी. दाणे आरोपी तर्फे अधिवक्ता
.............................................................................................................

**न्यायनिर्णय**
**(घोषित दि.११ जून,२०१८)**

१) आरोपी विरूध्द भा.दं.वि. कलम ४९८–अ सह ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

२) अभियोग पक्षाचे कथना नुसार गुन्हयाची हकीकत अशी आहे की,

प्रथम खबर देणार सौ.कल्याणी सुनिलराव राउत हिने दि. १८–०४–२०१७ रोजी पोलीस स्टेशन मोर्शी येथे असा रिपोर्ट दिला की, तिचे लग्न आरोपी क्र.१ सोबत दि.११–०५–२०१४ रोजी हिवरखेड येथे झाले. त्यानंतर ती आरोपी क्रं. १ सोबत नांदण्यासाठी तिचे सासरी गेली. तिला सुरुवातीचे एक महिना आरोपीनी चांगले वागविले व त्यानंतर तिच्या आईवडीलाकडून रुपये ३०,०००/– घेवून ये असे म्हटले व ते देण्यास उशिर झाल्यामुळे आरोपीने संगनमत करुन प्रथम खबर देणार हिला ति दिसायला सुंदर नाही व मुलबाळ होत नाही म्हणून व आरोपी क्रं.१ ला सोडचिठठी दे , नाहीतर तिचे वडीलाकडून ३०,०००/– रुपये घेवून येण्यास व दागीन्याची मागणी केली व तिला शिवीगाळ करुन तिला शाररिक व मानसिक छळ केला म्हणून प्रथम खबर देणार हिने वर उल्लेखित केल्याप्रमाणे पो.स्टे. मोर्शी येथे सदर

घटनेचा रिपोर्ट दिला. सदर घटनेचा रिपोर्ट ठाणे अमलदार ना.पो.का.१७२१ श्री.रविन्द्र लांजेवार यांनी गुन्हा क्र.२४८/१७ प्रमाणे नोंदविला, त्यानंतर पो.हे.कॉ. जगदीश खन, ब.नं.९९३ यांनी पूढील तपास केला. त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६१ प्रमाणे साक्षदारांचे बयान नोंदविले आरोपीना अटक करुन दोन पंचासमक्ष अटक पंचनामे तयार केले. गुन्हयाचा तपास पूर्ण करून आरोपीं विरूध्द सदरचे दोषारोपपत्र दाखल केले.

३) आरोपी हजर झाल्यानंतर आरोपी विरूध्द सदर गुन्हयाचे दोषारोप मांडले, ते यांना मराठीत वाचून व समजावून सांगितले. आरोपींनी गुन्हा नाकबूल केला व खटला चालविण्याची तयारी दर्शविली, ते दोषारोप नि.क्र.२० वर आहे. अभियोग तर्फे प्रथम खबर देणार कल्यानी सुनिल राउत हिची साक्ष साक्षदार क्र.१ म्हणून नि.क्र.२७ प्रमाणे व तिचे वडील अरुण शेषराव आघाडे यांची साक्ष साक्षदार क्र.२ म्हणून नि.क्र.२८ प्रमाणे नोंदविली. प्रथम खबर देणार हिने तिला प्रकरण पूढे चालवायचे नाही म्हणून सरकारी वकिलांमार्फत नि.क्र.२९ प्रमाणे पूर्सीस दाखल केली. आरोपीं विरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा आला नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वये घेण्यात येणारे जबाब वगळण्यात आले. बचाव पक्षातर्फे बचावार्थ कोणताही पुरावा दाखल करण्यात आला नाही किंवा कोणतेही दस्तऐवज दाखल करण्यात आले नाहीत.

४) उभय पक्षांचे परस्पर विरोधी कथने, त्यांनी सादर केलेले दस्तऐवज व त्यांच्या वतीने मांडलेले युक्तिवाद या वरून खालील मुद्दे माझे विचाराधिन येत असून त्यावरील मी माझे निश्कर्श खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अभियोग पक्षाने निःसंशयपणे शाबीत केले आहे काय की, प्रथम खबर देणार साक्षदार क्र.१ कल्याणी सुनिलराव राउत हिचे आरोपी क्र.१ सोबत ग्र झाल्यानंतर सर्व आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने दिनांक ११/०५/२०१४ चा एक महिण्यानंतर ते ७/०२/१७ पर्यंत ग्राम हिवरखेड, ता.मोर्शी येथे प्रथम खबर देणार साक्षदार क्र.१ हिला तिचे माहेरवरुन ३०,०००/– रुपये आण्ण्याकरीता व दागीन्याकरीता तिचा शारीरिक व मानसिक छळ केला? | ......नकारार्थी |
| २. काय आदेश ? | .... आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१</u>**

५) आरोपी विरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे प्रथम खबर देणार कल्यानी सुनिलराव राउत व तिचे वडील अरुन शेषराव आघाडे यांची

साक्ष नोंदविण्यात आ. साक्षीदार क्र.१ ही तथाकथीत घटनेतील पिडीत ईसम असून साक्षीदार क्र.२ हे तिचे वडील आहेत. सदर दोनही साक्षदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, प्रथम खबर देणार हिची साक्ष अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी देत नाही. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोग पक्षाने भारतीय साक्ष पुरावा अधिनियमचे कलम १५४ प्रमाणे तिची उलट तपासणी घेतली. परंतु तिच्या साक्षीवरून आरोपीं विरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा आणण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरले. अभियोग पक्षाने प्रथमखबर , अटकपंचनामे शाबीत केले नाही.

६) वरिल विवेचनावरुन असे निसशंयपणे शाबीत होत नाही की,प्रथम खबर देणार साक्षदार क्र.१ कल्याणी सुनिलराव राउत हिचे आरोपी क्र.१ सोबत ग्न झाल्यानंतर सर्व आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने दिनांक ११/०५/२०१४ चा एक महिण्यानंतर ते ७/०२/१७ पर्यंत ग्राम हिवरखेड, ता.मोशी येथे प्रथम खबर देणार साक्षदार क्र.१ हिला तिचे माहेरवरुन ३०,०००/– रुपये आण्याकरीता व दागीन्याकरीता तिचा शारीरिक व मानसिक छळ केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २</u>**

७) मी माझे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदविले असल्यामुळे आरोपींना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरेल. सदर

प्रकरणात कोणताही मुद्देमाल जप्त नसल्यामुळे त्याच्या विल्हेवाटी बाबतच्या आदेशाची आवश्यकता दिसून येत नाही.वरील सर्व तथ्यांच्या विचारांती मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी सुनिल देविदास राउत , देविदास महादेव राउत , सौ.संगिता अशोकराव केमेकर, सौ. माधुरी जितेन्द्र बोबडे, वर्षा उर्फ सोनू नितीनराव बोबडे यांची भारतीय दंड संहितेचे कलम ४९८–अ सह ३४ च्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) नूसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींनी दिलेले जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी कलम ४३७–अ फौजदारी पक्रिया संहिता अंतर्गत सहा महीन्याच्या कालावधीकरिता प्रत्येकी ७,०००/– रू. जामीन वरीष्ठ न्यायालयात अपील झाल्यास तेथे हजर राहण्या बाबत द्यावा.

सही/–
(आ.म.गोंडाणे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
मोर्शी

मोर्शी
दि..११.०६.२०१८